**RNI No. MAHBIL /2009/31733**
**Reg. No. MCS/173/2016-18**

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष २, अंक ११२(९)] शुक्रवार, डिसेंबर २३, २०१६/पौष २, शके १९३८ [पृष्ठे १०, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १७७**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ डिसेंबर २०१६.

### अधिसूचना

**स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६.**

क्रमांक रिइप्रा. २०१६/प्र. क्र. ७९/दुवपू-२.—स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ च्या कलम ८४ याची पोट-कलमे (१) व (२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासनाने करण्याचे योजिलेल्या नियमांचा पुढील मसुदा, त्यामुळे बाधा पोहोचण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीकरिता याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे, आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, उक्त नियमांचा मसुदा दिनांक २३ डिसेंबर २०१६ रोजी किंवा त्यानंतर महाराष्ट्र शासन विचारात घेईल.

२. उपरोक्त दिनांकास किंवा त्यापूर्वी, उक्त मसुद्याबाबत, कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती वा सूचना, ई-मेल द्वारे *suggesstionsonrera@maharashtra.gov.in* वर किंवा टपालाद्वारे प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे प्राप्त होतील, त्या शासन विचारात घेईल.

## नियमांचा मसुदा

स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ याच्या कलम ८४ च्या पोट-कलम (१) आणि पोट-कलम (२) मधील खंड (फ), (ब), (भ), (म) आणि खंड (यच) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण, भाग चार-अ, दिनांक *** २०१६ मध्ये प्रसिध्द झालेल्या, शासकीय अधिसूचना, क्र. *** दिनांक *** २०१६, अनुसार प्राप्त झालेल्या सूचना विचारात घेतल्यानंतर, महाराष्ट्र शासन याद्वारे, पुढील नियम करीत आहे :-

### प्रकरण एक
### प्रारंभिक

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ**.- या नियमांस महाराष्ट्र स्थावर संपदा अपील न्यायाधिकरण अधिकारी व कर्मचारी (नियुक्ती व इतर सेवाशर्ती) नियम, २०१६, असे म्हणावे.

२. **व्याख्या**.- (१) या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

(क) “अधिनियम” याचा अर्थ, स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ (२०१६ चा १६), असा आहे;

(ख) “अपील न्यायाधिकरण” याचा अर्थ, राज्य शासनाने, राजपत्रातील अधिसूचनेव्दारे, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रासाठी किंवा क्षेत्रांसाठी अधिनियमाच्या कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये स्थापन केलेले महाराष्ट्र स्थावर संपदा अपील न्यायाधिकरण असा आहे आणि त्यात निरनिराळ्या क्षेत्रांसाठी स्थापन करण्यात येतील अशा निरनिराळ्या अपील न्यायाधिकरणांचा समावेश होतो ;

(ग) “नमुना” याचा अर्थ, या नियमांना जोडलेला नमुना असा आहे;

(घ) “कलम” याचा अर्थ, या अधिनियमांचे कलम, असा आहे;

(ङ) “निवड समिती” याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ४६ च्या पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट समिती असा आहे;

(च) “राज्य शासन किंवा शासन” याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे.

(२) यात यापूर्वी वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना अधिनियमात त्यांना जे अर्थ नेमून देण्यात आले असतील, अनुक्रमे तेच अर्थ असतील.

## प्रकरण दोन

## महाराष्ट्र स्थावर संपदा अपील न्यायाधिकरण

३. **महाराष्ट्र स्थावर संपदा अपील न्यायाधिकरण**.- शासनास, राजपत्रातील अधिसूचनेव्दारे, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्राकरीता अपील न्यायाधिकरण स्थापन करता येईल.

४. **निवड समितीची कार्यपध्दती**.- (१) राज्य शासन, अपील न्यायधिकरणाच्या सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी किंवा अपील न्यायाधिकरणात कोणतेही पद रिक्त होईल किंवा रिक्त होण्याची शक्यता असेल तेव्हा, असे कोणतेही रिक्त पद भरण्यासाठी निवड समितीकडे निर्देश करील.

(२) निवड समितीस, न्यायाधिकरणाच्या सदस्यांची निवड करण्याच्या प्रयोजनार्थ, अधिनियमाच्या कलम ४६ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ग) मध्ये विनिर्दिष्ट केलेली आवश्यक ती अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या केंद्र व राज्य शासनाच्या सेवेतील योग्य अधिकाऱ्यांसह अपील न्यायाधिकरणाच्या सदस्यांची निवड करण्याकरिता विचार केला जाण्यासाठी किंवा मागविण्यात येणाऱ्या अर्जांसाठी घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार योग्य असणाऱ्या व्यक्तींच्या नावाची एक नामिका सुचविण्यासाठी, निवड समितीला योग्य वाटतील अशा व्यक्तींचा समावेश असलेली एक शोध समिती नियुक्त करता येईल.

(३) त्यानंतर, निवड समिती, राज्य शासनाकडे निर्देशित करावयाचे रिक्त पद किंवा रिक्त पदांसाठी तीनपेक्षा अधिक नसतील इतक्या व्यक्तींची, एका नामिकेच्या स्वरुपात राज्य शासनाकडे स्वतंत्र पसंतीक्रमाने विचारार्थ शिफारस करील.

(४) निवड समिती, पोट-नियम (१) अन्वये निर्देश केल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांहून अधिक नसेल अशा कालावधीच्या आत राज्य शासनाकडे तिच्या शिफारशी सादर करील.

(५) निवड समिती सर्वसाधारणपणे आपली बैठक मुंबई येथे आयोजित करील किंवा अशा बैठकीच्या ठिकाणात बदल केल्याबद्दलची कारणे नमूद करुन अध्यक्ष ठरवील अशा कोणत्याही ठिकाणी ती बैठक आयोजित करील.

(६) निवड समितीच्या बैठकीची नोटीस किंवा, यथास्थिति, कार्यसूची ही, आगाऊ काढण्यात येईल. बैठकीचा दिनांक आणि ठिकाण हे निवड समितीच्या अध्यक्षाच्या सोयीनुसार निश्चित करण्यात येईल.

(७) गृहनिर्माण विभागाचा सचिव हा निवड समितीचा आमंत्रक असेल.

५. **सदस्यांची नियुक्ती**.- राज्य शासन, निवड समितीने केलेल्या शिफारशीप्रमाणे पसंतीक्रमानुसार सदस्यांच्या नियुक्तीसाठी किंवा रिक्त पदे भरण्यासाठी निवड समितीच्या शिफारशी विचारात घेईल. राज्य शासनाने पसंतीक्रमानुसार एखाद्या व्यक्तीची नियुक्ती न केल्यास, शासन त्याबाबतची कारणे लेखी नमूद करील.

## प्रकरण तीन
## वेतन व भत्ते

६. **अपील न्यायाधिकरणाच्या अध्यक्षास व सदस्यांस देय असलेले वेतन व भत्ते आणि त्यांच्या इतर सेवाशर्ती**.- (१) अपील न्यायाधिकरणाच्या अध्यक्षास व सदस्यांना देय असलेले वेतन व भत्ते पुढीलप्रमाणे असतील,-

क) अध्यक्षास, उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाच्या मासिक वेतनाइतके मासिक वेतन देण्यात येईल.

ख) पूर्णकालिक सदस्यांस, राज्य शासनाच्या मुख्य सचिवाच्या वेतनाइतके मासिक वेतन देण्यात येईल,

(२) **रजा**.- अध्यक्ष आणि प्रत्येक सदस्य हा, सेवेच्या प्रत्येक वर्षात तीस दिवसांची अर्जित रजा मिळण्यास हक्कदार असेल.

(३) **रजा मंजुरी प्राधिकारी**.- क) अपील न्यायाधिकरणाच्या अध्यक्षाच्या बाबतीत, उच्च न्यायालयाचा मुख्य न्यायमूर्ती हा रजा मंजुरी प्राधिकारी असेल; आणि

ख) अपील न्यायाधिकरणाच्या सदस्याच्या बाबतीत, अध्यक्ष हा रजा मंजुरी प्राधिकारी असेल.

(३) अध्यक्षाचे व पूर्णकालिक सदस्याचे इतर भत्ते व सेवाशर्ती या शासनाने वेळोवेळी काढलेल्या आदेशानुसार असतील;

परंतु, अशी वित्तलब्धी ही, सेवेत असणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत, तो अन्यथा ज्या वित्तलब्धीसाठी पात्र ठरेल त्या वित्तलब्धीपेक्षा कमी असणार नाही.

**७. पदावधी**.- (१) पदावधी- अध्यक्ष व सदस्य, यांचा पदावधी अधिनियमाच्या कलम ४७ च्या पोट-कलम (१) व (२) अनुसार असेल.

(२) जेव्हा अध्यक्ष, अनुपस्थिती, आजारपण किंवा इतर कोणत्याही कारणाने त्याची कर्तव्ये बजावण्यास असमर्थ असेल तेव्हा, त्यावेळी पद धारण करणारा अपील न्यायाधिकरणाचा वरिष्ठतम न्यायिक सदस्य (नियुक्तीच्या क्रमाने) हा, अध्यक्ष पुन्हा आपल्या कर्तव्यांचा कार्यभार स्वीकारण्याच्या दिवसापर्यंत अध्यक्षाची कर्तव्ये पार पाडील.

(३) जर अध्यक्षाचे पद, त्याचा मृत्यू किंवा राजीनामा यामुळे रिक्त झाल्यास, राज्य शासन, अध्यक्ष म्हणून काम करण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकाच्या वरिष्ठतेनुसार वरिष्ठतम न्यायिक सदस्याचे नामनिर्देशन करील आणि अशा प्रकारे नामनिर्देशित केलेला सदस्य अधिनिमाच्या कलम ४६ अन्वये नवीन नियुक्तीव्दारे अध्यक्षाचे रिक्त पद भरण्यात येईतोपर्यंत अध्यक्षाचे पद धारण करील. त्या कालावधीत, त्यावेळी पद धारण करणारा अपील प्राधिकरणाचा वरिष्ठतम न्यायिक सदस्य (नियुक्तीच्या क्रमाने) अध्यक्ष पुन्हा आपल्या कर्तव्यांचा कार्यभार स्वीकारण्याच्या दिवसापर्यंत अध्यक्षाची कर्तव्ये पार पाडील.

**८. पद आणि गोपनीयतेची शपथ**.- (१) प्राधिकरणाचा अध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती, आपले पद धारण करण्यापूर्वी, शासनाच्या गृहनिर्माण विभागाच्या प्रभारी मंत्र्यासमोर या नियमांना जोडलेल्या अनुक्रमे नमुना एक आणि नमुना दोन मध्ये पद आणि गोपनीयतेची शपथ घेईल आणि त्यावर स्वाक्षरी करील.

(२) सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती, आपले पद ग्रहण करण्यापूर्वी अपील न्यायाधिकरणाच्या अध्यक्षासमोर, या नियमांना जोडलेल्या, अनुक्रमे नमुना एक आणि नमुना दोन मध्ये पद व गोपनीयतेची शपथ घेईल व त्यावर स्वाक्षरी करील.

९. **आर्थिक किंवा इतर हितसंबंध घोषित करणे**.- नियुक्तीपूर्वी अध्यक्ष आणि सदस्य, त्याने असा अध्यक्ष किंवा सदस्य या नात्याने त्याच्या कार्यावर बाधक परिणाम होण्याचा संभव असेल अशा स्वरुपाचे कोणतेही आर्थिक किंवा इतर हितसंबंध संपादित केलेले नाहीत किंवा ते संपादित करणार नाही, असे नमुना तीनमध्ये एक हमीपत्र सादर करील.

## प्रकरण चार

## चौकशी करण्याची आणि अध्यक्ष व सदस्य यांना काढून टाकण्याची कार्यपध्दती

१०. **चौकशीची कार्यपध्दती**.- (१) अधिनियमाच्या कलम ४९ च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कारणांवरुन अध्यक्ष किंवा सदस्य यांच्याविरुध्द चौकशी करण्यास पुरेशी कारणे आहेत असे राज्य शासनाचे ज्या ज्या वेळी मत होईल त्या त्या वेळी राज्य शासनास मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींशी विचारविनिमय केल्यानंतर अशी चौकशी करण्याच्या प्रयोजनार्थ एखाद्या न्यायाधीशाची नियुक्ती करता येईल.

(२) शासन, अध्यक्षावरील किंवा, यथास्थिति, सदस्यावरील दोषारोपांची माहिती देईल.

(३) **राज्य शासन,-**

(क) अध्यक्षावरील किंवा, यथास्थिति, सदस्यांवरील दोषारोपांच्या विवरणपत्रांच्या प्रती;

(ख) चौकशीच्या संबंधातील महत्वाच्या कागदपत्रांच्या व इतर पुराव्यांच्या प्रती; अशा नियुक्ती केलेल्या न्यायाधीशाकडे अग्रेषित करील.

११. **न्यायाधीशाचे अधिकार**.- (१) असा नियुक्त केलेला न्यायाधीश, अध्यक्षाला किंवा, यथास्थिति, सदस्याला दोषारोपांची एक प्रत आणि कागदपत्रांची सूची, कोणतीही असल्यास, देईल किंवा देण्याची व्यवस्था करील, आणि तो परवानगी देईल अशा मुदतीत त्या अध्यक्षाला किंवा सदस्याला आपल्या बचावाचे लेखी उत्तर किंवा निवेदन सादर करण्यास फर्मावील.

(२) न्यायाधीश, नैसर्गिक न्याय तत्वांचे पालन करील आणि त्यास, चौकशीचे ठिकाण व वेळ निश्चित करण्यासह आपली स्वत:ची कार्यपध्दती विनियमित करण्याचा अधिकार असेल.

(३) एखाद्या दाव्याची न्यायचौकशी करताना न्यायाधीशास, या नियमांखालील त्याची कर्तव्ये पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ, दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ (१९०८ चा ५), अन्वये एखाद्या दिवाणी न्यायालयाकडे जे अधिकार निहित असतात तेच अधिकार असतील, त्या बाबी पुढीलप्रमाणे :-

(क) कोणत्याही व्यक्तीला समन्स पाठवून बोलावणे व तिला उपस्थित राहण्यास भाग पाडणे आणि तिची शपथेवर तपासणी करणे;

(ख) दस्तऐवजाचा शोध घेण्यास व तो सादर करण्यास भाग पाडणे;

(ग) शपथपत्रावर साक्षीपुरावा स्वीकारणे; आणि

(घ) भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ (१८७२ चा १), याची कलमे १२३ आणि १२४ यांच्या तरतुदींना अधीन राहून, कोणत्याही कार्यालयाकडून कोणताही सार्वजनिक अभिलेख किंवा दस्तऐवज किंवा अशा अभिलेखाची किंवा दस्तऐवजाची प्रत मागविणे.

(४) अपील न्यायाधिकरणाचा अध्यक्ष किंवा सदस्य कोणत्याही शारीरिक किंवा मानसिक अक्षमतेमुळे त्याच्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ बनला असल्याबाबत आरोप करण्यात आला असेल आणि तो आरोप नाकबूल करण्यात आला असेल, त्या बाबतीत, न्यायाधीशास, त्या अपील न्यायाधिकरणाच्या अध्यक्षाची किंवा सदस्याची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी त्यास योग्य वाटेल अशी आवश्यक ती कार्यवाही करता येईल.

(५) चौकशीच्या निष्कर्षानंतर, न्यायाधीश प्रत्येक दोषारोपाबाबतचे आपले निष्कर्ष आणि त्याबद्दलची कारणे स्वतंत्रपणे त्यास योग्य वाटतील अशा निरीक्षणासह नमूद करुन तसा अहवाल राज्य शासनाला सादर करील. तसेच ते आरोप सिध्द झालेत किंवा नाहीत हे स्पष्टपणे नमूद करुन त्या चौकशीचे निष्कर्ष चौकशी अहवालासोबत राज्य शासनाला सादर करण्यात येतील.

(६) अशा प्रकारे प्राप्त झालेल्या शिफारशींसह चौकशी अहवालाच्या आधारे, राज्य शासन, मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींशी विचारविनिमय करुन, आदेशाव्दारे एकतर अध्यक्षाला किंवा, यथास्थिति, सदस्याला काढून टाकण्याबाबत किंवा अन्यथा निर्णय घेईल.

१२. **रिक्त जागा भरणे**.- राज्य शासन, अशा प्रकारे काढून टाकण्यात आल्यामुळे रिक्त झालेले अध्यक्षाचे किंवा, यथास्थिति, सदस्याचे पद भरण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही सुरु करील.

## प्रकरण पाच
## न्यायधिकरणाचे अधिकारी व इतर कर्मचारी यांच्या सेवेच्या शर्ती

१३. **न्यायाधिकरणाच्या अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे प्रवर्ग.-** न्यायाधिकरणाचे स्वरुप व न्यायाधिकरणाच्या अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे प्रवर्ग याबाबत राज्य शासनाच्या विचारार्थ न्यायाधिकरणाकडून शिफारस करण्यात येईल आणि त्यास राज्य शासनाकडून फेरबदलांसह किंवा, यथास्थिति, फेरबदलांशिवाय मान्यता देण्यात येईल.

१४. सेवेच्या शर्ती.- (१) वेतन, भत्ते, रजा, पदग्रहण अवधी, पदग्रहण अवधीचे वेतन, भविष्यनिर्वाह निधी, नियत सेवावधी, निवृत्तिवेतन व सेवानिवृत्तीविषयक लाभ आणि इतर सेवाशर्ती या बाबीसंबंधातील राज्य शासनाकडून नियुक्त केलेल्या अपील न्यायाधिकरणाच्या अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या आणि कोणत्याही अन्य प्रवर्गातील कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या शर्ती राज्य शासनाच्या तत्सम वेतनश्रेणी घेणाऱ्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना वेळोवेळी लागू असतील अशा नियमांनुसार व विनियमांनुसार विनियमित करण्यात येतील.

## प्रकरण सहा
## संकीर्ण

१५. **अर्थ लावणे**.- या नियमांचा अर्थ लावण्याच्या संबंधात कोणताही प्रश्न उद्भवल्यास कोणताही प्रश्न किंवा एखाद्या विशिष्ट बाबीसंबंधी या नियमांमध्ये कोणतीही स्पष्ट तरतूद केलेली नसेल तेव्हा ती बाब निर्णयार्थ राज्य शासनाकडे सोपविण्यात येईल. राज्य शासन, अधिनियमाच्या अर्थातंर्गत कारणे नमूद करुन निर्णय घेईल. राज्य शासनाचा निर्णय अपील न्यायाधिकरणावर बंधनकारक असेल.

१६. अवशिष्ट तरतुदी.- अपील न्यायाधिकरण अध्यक्षाच्या किंवा सदस्यांच्या सेवेच्या अटी व शर्तींच्या ज्या बाबीसंबंधात या नियमांमध्ये कोणतीही स्पष्ट तरतूद करण्यात आली नसेल अशा बाबी निर्णयार्थ, राज्य

शासनाकडे निर्देशित करील, आणि त्यावरील राज्य शासनाचा निर्णय, अध्यक्षावर किंवा, यथास्थिति, सदस्यांवर बंधनकारक असेल.

## नमुना-एक

[ नियम ९ पहा ]

स्थावर संपदा अपील न्यायाधिकरणाच्या अध्यक्षपदाच्या / सदस्यपदाच्या शपथेचा नमुना

मी, --------------------------, महाराष्ट्र स्थावर संपदा अपील न्यायाधिकरणाचा अध्यक्ष / सदस्य (लागू नसेल तो भाग खोडावा) म्हणून नियुक्त झालो असून, गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करतो आणि ईश्वरसाक्ष शपथ घेतो की, मी अध्यक्ष / सदस्य (लागू नसेल तो भाग खोडावा) म्हणून माझी कर्तव्ये, निष्ठापूर्वक व शुध्द बुध्दीने आणि कोणाच्याही विषयी ममत्वभाव किंवा आकस न बाळगता, माझ्या पूर्ण क्षमतेनिशी ज्ञान व विवेकानिशी निर्भयपणे व निष्पक्षपणे पार पाडीन.

दिनांक :

(अध्यक्षाचे / सदस्याचे नाव)
महाराष्ट्र स्थावर संपदा अपील न्यायाधिकरण

## नमुना-दोन

[ नियम ९ पहा ]

महाराष्ट्र स्थावर संपदा अपील न्यायाधिकरणाच्या अध्यक्षाकरता / सदस्यांकरता गोपनीयतेच्या शपथेचा नमुना

मी, -----------------------, महाराष्ट्र स्थावर संपदा अपील न्यायाधिकरणाचा अध्यक्ष / सदस्य (लागू नसेल तो भाग खोडावा ) म्हणून नियुक्त झालो असून, गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करतो आणि ईश्वरसाक्ष शपथ घेतो की, मी, अध्यक्ष / सदस्य (लागू नसेल तो भाग खोडावा) म्हणून माझ्या विचारार्थ आणली जाईल किंवा मला ज्ञात होईल अशी कोणतीही बाब, असा अध्यक्ष / सदस्य (लागू नसेल तो भाग खोडावा) म्हणून माझी कर्तव्ये

यथायोग्य पार पाडण्यासाठी आवश्यक असेल ते खेरीज करुन एरव्ही, कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींना प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कळवणार नाही किंवा त्यांच्याकडे उघड करणार नाही.

दिनांक :

(अध्यक्षाचे / सदस्याचे नाव)
महाराष्ट्र स्थावर संपदा अपील न्यायाधिकरण

**नमुना-तीन**

[ नियम १० पहा ]

कोणतेही प्रतिकूल आर्थिक किंवा इतर हितसंबंध संपादित न करण्याबद्दलचे प्रतिज्ञापन

मी, -----------------------, महाराष्ट्र स्थावर संपदा अपील न्यायाधिकरणाचा अध्यक्ष / सदस्य (लागू नसेल तो भाग खोडावा) म्हणून नियुक्त झालो असून, गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करतो आणि असे घोषित करतो की, मी, स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाचा अध्यक्ष / सदस्य (लागू नसेल तो भाग खोडावा) म्हणून माझ्या कार्यावर बाधक परिणाम होण्याचा संभव असेल अशा स्वरुपाचे कोणतेही आर्थिक किंवा इतर हितसंबंध ठेवलेले नाहीत किंवा ते भविष्यात ठेवणार नाही.

दिनांक :

(अध्यक्षाचे / सदस्याचे नाव)
महाराष्ट्र स्थावर संपदा अपील न्यायाधिकरण

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रा. कों. धनावडे,
शासनाचे उप सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, Editor : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.